DAY — **07** SEAT NUMBER | | | | | | | |

2026	II	17	1100	**J-142**	(M)

SECRETARIAL PRACTICE (52)

Time : 3 Hrs. **(7 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(३) डावीकडील अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.

(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.

प्र. १. (अ) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) कंपनीकडून भागांचे वाटप न केलेल्या भाग अर्जदारांना -------- पत्र पाठविले जाते.

(अ) दिलगिरी

(ब) त्यागपत्र

(क) भाग वाटप

(२) वित्त म्हणजेच कंपनीच्या -------- बाबींचे व्यवस्थापन करणे.

(अ) आर्थिक

(ब) विपणन

(क) उत्पादन

(३) भाग धारकांना मोफत भाग वाटप केलेल्या भागांना ---------- भाग म्हणतात.

(अ) अग्रहक्क

(ब) समहक्क

(क) बोनस

(४) कंपनीला ---------- महिन्यांपेक्षा जास्त मुदतीच्या ठेवी स्वीकारता येत नाहीत.

(अ) २४

(ब) ३६

(क) ४५

(५) --------- कंपनीच्या व्यवस्थापनामध्ये सहभाग असतो.

(अ) अग्रहक्क भागधारकांचा

(ब) ठेवीदारांचा

(क) समहक्क भागधारकांचा

(ब) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा : (५)

(१) कंपनीकडून धनकोंना दिला जाणारा गुंतवणुकीवरील परतावा.

(२) वित्त पुरवठा करणारा अंतर्गत स्रोत.

(३) सरकारच्या वतीने मध्यवर्ती बँकेने सादर केलेले विपत्र.

(४) कायद्यातील तरतुदीनुसार केले जाणारे भागांचे हस्तांतर.

(५) कर्जरोखे धारण केल्याचा पुरावा.

(क) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा : (५)

(१) मंदीवाला भागांच्या किमतीत वाढ होईल असा अंदाज बांधतो.

(२) बंधपत्रे हे अल्प मुदतीचे निधी पुरवितात.

(३) कंपनीला नफ्याची पर्वा न करता लाभांश द्यावा लागतो.

(४) भौतिक स्वरूपातील प्रतिभूती फंगीबल असतात.

(५) सभासद नोंदवहीत कर्जरोखे धारकांचा सर्व तपशील नोंदविला जातो.

(ड) कंसातील अचूक पर्याय निवडा : (५)

गट 'अ'	गट 'ब'
(अ)	(१) सभासदांकडून ठेवी
(ब) भारतातील पहिली भागपेढी	(२) ....
(क)	(३) भांडवल बाजार
(ड) सार्वजनिक ठेवी	(४) ....
(इ)	(५) निफ्टी (Nifty)

(अल्प मुदतीचे कर्ज, खाजगी कंपनी, एन एस डी एल,

राष्ट्रीय भाग बाजाराचा निर्देशांक, दीर्घकालीन निधी)

प्र. २. खालील संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा (कोणत्याही चार) : **[८]**

(१) कर्जरोखे प्रमाणपत्र

(२) स्थिर भांडवल

(३) ठेवीची नोंदवही

(४) डिमटेरियलायझेशन

(५) भाग बाजार

(६) अधिविकर्ष

प्र. ३. खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा (कोणत्याही दोन) : **[६]**

(१) सौ. खुशी यांची स्वत:च्या नावे डिमॅट खाते उघडण्याची इच्छा आहे.

(अ) एन. एस. डी. एल.च्या मुंबई कार्यालयात जाऊन त्या खाते उघडू शकतात का?

(ब) त्यांना खाते उघडण्यासाठी व देखभालीसाठी शुल्क द्यावे लागले का?

(क) डिमॅटीकरणासाठी त्यांना संबंधित कंपनीकडे भाग पाठवावे लागतील का?

(२) हर्ष कंपनी लिमिटेडने अंतरिम लाभांश देण्याचे निश्चित केले.

(अ) पुरेशा नफ्याअभावी ₹ १०/- प्रतिभाग अंतरिम लाभांश देण्याचा संचालक मंडळाचा निर्णय योग्य आहे का?

(ब) संचालक मंडळ मुक्त राखीव निधीतून लाभांश देऊ शकते का?

(क) भागधारकांना लाभांशाची घोषणा केल्यापासून किती दिवसांच्या आत लाभांश वाटप केले पाहिजे?

(३) एन्जेल कंपनी लिमिटेडची सार्वजनिक ठेवीद्वारे भांडवल उभारणीची योजना असून त्यांची निव्वळ मालमत्ता ही ₹ २५० कोटी आहे.

(अ) कंपनीला आम जनतेकडून ठेवी स्वीकारता येतील का?

(ब) कंपनी ५ वर्ष मुदतीच्या ठेवी स्वीकारू शकते का?

(क) ठेवीची पावती ठेवीदारास किती दिवसांत द्यायला पाहिजे?

प्र. ४. खालीलपैंकी फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) समहक्क भाग आणि अग्रहक्क भाग

(२) लाभांश आणि व्याज

(३) अडत्या आणि दलाल

(४) प्राथमिक सार्वजनिक विक्री (IPO) आणि नंतरची सार्वजनिक विक्री (FPO)

प्र. ५. थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **[८]**

(१) ठेवींच्या स्वीकृती बाबतच्या कोणत्याही चार अटी व शर्ती विशद करा.

(२) अंतरिम लाभांशाची वैशिष्ट्ये विशद करा.

(३) खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे कोणतेही चार घटक विशद करा.

प्र. ६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) : **[८]**

(१) कर्जरोख्यांची विक्री करताना कंपनीला कर्जरोखे विश्वस्तांची नेमणूक करावी लागते.

(२) भागपेढी पद्धती ही बँकिंग पद्धती सारखीच आहे.

(३) नाणे बाजारात विविध भागीदार समाविष्ट असतात.

(४) हक्क भाग विक्री करताना कंपनीला कंपनी कायद्यातील तरतुदींचे पालन करावे लागते.

प्र. ७. खालील प्रश्न सोडवा (कोणतेही दोन) : **[१०]**

(१) लाभांशाचा दर कमी असल्याबद्दल तक्रार करणाऱ्या भागधारकाच्या पत्रास उत्तर लिहा.

(२) कर्जरोखेधारकास कर्जरोख्याचे समहक्क भागात परिवर्तनात केल्याची माहिती देणारे पत्र लिहा.

(३) कंपनीच्या ठेवीदारास ठेव ठेवल्याबद्दल आभाराचे पत्र लिहा.

SEAT NUMBER | | | | | | | |

प्र. ८. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणताही एक) : **[८]**

(१) कर्जरोखे म्हणजे काय? कर्जरोख्यांचे विभिन्न प्रकार स्पष्ट करा.

(२) भागवाटपाची कार्यपद्धती थोडक्यात स्पष्ट करा.

◆◆◆